## '' फिनोलेक्स ॲकॅडमी येथे मुंबई विद्यापीठ अंतर्गत क्रॉसकंट्री रेस २०१६-१७ संपन्न ''

होप फाउंडेशनच्या फिनोलेक्स ॲकॅडमी ऑफ मॅनेजमेंन्ट अँन्ड टेक्नोलॉजी, रत्नागिरी येथे राष्ट्रीय क्रिडादिन (मेजर ध्यानचंद सिंग यांची जयंती) निमित्त मुंबई विद्यापीठा अंतर्गत आंतरमहाविद्यालयीन क्रॉसकंट्री रेस २०१६-१७ दि २९/०८/२०१६ रोजी संपन्न झाली.

या स्पर्धेचे उद्घाटन फिनोलेक्स ॲकॅडमीचे प्राचार्य डॉ.एस्.एस्.गोईलकर यांनी झेंडा दाखवून केले. या स्पर्धेमध्ये विद्यापीठा अंतर्गत महाविद्यालयातील महिला गटात ६ किमी मध्ये २६ संघांनी व पुरुष गटात १२ किमी मध्ये ५४ संघांनी तसेच विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयातील जवळपास ७५० विद्यार्थ्यांनी प्रथमच एवढया मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. सदर संपूर्ण स्पर्धेचे प्रायोजक फिनोलेक्स पाईप्स होते.

बक्षिस वितरणाची सुरुवात दिपप्रज्चलनाने झाली यावेळी फिनोलेक्स महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थींनीनी मुंबई विद्यापीठ गीत अतिशय सुंदररित्या सादर केले.बक्षिस वितरण समारंभात मुंबई विद्यापीठाचे शारीरिक शिक्षण व क्रिडा संचालक डॉ उत्तम क्रेंद्रे, फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे डॉ आशुतोष मुळे, फिनोलेक्स ॲकॅडमीचे प्राचार्य डॉ.एस्.एस्.गोईलकर, उपप्राचार्य डॉ कौशल प्रसाद, डिन व क्रिडा प्रमुख डॉ एस बी कुलकर्णी व रजिस्ट्रार मयुर तारगांवकर हे व्यासपीठावर उपस्थित होते.

बक्षिस वितरण समारंभात फिनोलेक्सचे प्राचार्य डॉ.एस्.एस्.गोईलकर यांनी सर्व सहभागी महाविद्यालये व विद्यार्थ्यांचे स्वागत केले. व मुंबई विद्यापीठाने फिनोलेक्स ॲकॅडमीला क्रॉसकंट्री रेस २०१६-१७ चे आयोजन करण्याची संधी दिल्याबद्दल मुंबई विद्यापीठाचे आभार मानले. प्रमुख प्रायोजक फिनोलेक्स पाईप्स तर्फे डॉ. आशुतोष मुळे यांनी मनोगत व्यक्त केले. मुंबई क्रिडाविभागाचे संचालक डॉ उत्तम क्रेंद्रे यांनी या स्पर्धेच्या उत्कृष्ट संयोजनासाठी फिनोलेक्स ॲकॅडमीचे विशेष कौतुक केले व सहभागी महाविद्यालये व विद्यार्थी यांचे अभिनंदन केले.

मुंबई विद्यापीठा अंतर्गत आंतरमहाविद्यालयीन क्रॉसकंट्री रेस २०१६-१७ पुरुष विभाग सांघिक विजेतेपद प्रथम RKT कॉलेज, उल्हासनगर, द्वितीय MPASC कॉलेज, पनवेल, तृतीय P M PATIL कॉलेज तसेच महिला विभागात प्रथम गोगटे जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी, द्वितीय डीबीजे कॉलेज, चिपळूण, तृतीय पाटपन्हाळे कॉलेज, गुहागर यांनी मिळवले.

वैयक्तीक विजेतेपद पुरुष विभागामध्ये प्रथम - मोरगन ज्ञानेश्वर RKT कॉलेज, उल्हासनगर, द्वितीय - गंगोडा शैलेश SDSM कॉलेज, पालघर, तृतीय - चंदवडे मयूर शरद , वराडकर कॉलेज, दापोली तसेच महिला विभागामध्ये प्रथम - जडयार अक्षया सुरेंद्र PTVA कॉलेज, विलेपार्ले, द्वितीय - वनमोरे पुजा पांडुरंग, ASC कॉलेज, मोखाडा, तृतीय - देशमुख माधुरी सुनिल SICES कॉलेज, अंबरनाथ यांनी मिळवले. या स्पर्धेसाठी परिक्षक म्हणून सुशिल इनामदार यांनी काम पाहिले. यावेळी विजेत्यांना मुंबई विद्यापीठाचे पदक, ट्रॉफी व प्रमाणपत्र देण्यात आले.

या कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन व सूत्रसंचालन प्रा. दर्शना बापट यांनी केले.